# Good Work Of Nagpur Rural Police

## खुनाचा मुख्य सुत्रधार आरोपीसह तिघे जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची व पोलीस स्टेशन कन्हानची कारवाई

दि. 29/06/2018 रोजी दुपारी 16.30 वा. दरम्यान मृतक नामे– विनोद यादवराव सोमकुवर, वय 36 वर्ष, रा. गोंडेगाव कॉलोनी बोरडा रोड हा आपल्या मारोती स्विफ्ट गाडी क्र. एमएच–40/एआर–2841 नी हायवे रोडनी आपल्या विनीत हॉटेल ॲण्ड रेस्टारेन्ट ढाबा डुमरी येथे जात असता यातील अज्ञात आरोपीतांनी गाडीचा पाठलाग करून अज्ञात कारणावरून सदर मृतकास धारदार शस्त्रानी गळयावर व पोटावर मारून जिवानीशी ठार केल्याने पो. स्टे कन्हान येथे अप. क्र. 234/18 कलम 302 भा.दं.वि. सहकलम, 4/25 भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेवुन गुन्ह्यात वापरलेले शस्त्र जप्त करण्याबाबत आदेश दिल्याने पो.नि. स्थागुशा यांनी विशेष पथक तयार करुन मार्गदर्शनाप्रमाणे सदर स्थानीक गुन्हे शाखेचे पथक दि. 01/07/2018 रोजी रात्री आरोपी शोध मोहीम कामी फिरत असता त्यांना त्यांचे मुखबिर व्दारे बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी 1) निषेध महादेव वासनिक, वय 31 वर्ष, रा. आराधना नगर, नागपूर 2) सोनु उर्फ बाबा उर्फ रामु हिरामण वनवे, वय 26 वर्ष, रा. किर्ती नगर, नागपूर व 3) नितीन माणीकराव देशमुख, वय 33 वर्ष, रा. बेलदार नगर, नागपूर हे स्विफ्ट कारने खरबी चौक येथे उभे असुन ते लगेच बाहेरगावी जाण्याचे तयारीत आहे. या खात्रीशीर बातमीवरुन स्थानीक गुन्हे शाखेचे पथक यांनी वेळ न घालवता लगेच खरबी चौक, नागपुर शहर येथे पाहचले असता कार मधील आरोपी हे पोलीसांना पाहताच पळु लागले पथकाने त्यांचा पाठलाग करुन 22.30 वा. पकडुन ताब्यात घेतले. व पुढील कार्यवाही करीता स्विफ्ट कारसह तिन्ही आरोपीतांना पो. स्टे. कन्हान चे ताब्यात दिले. सदर गुन्हयातील उर्वरीत आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे.

सदरचा गुन्हयातील आरोपी 1) निषेध महादेव वासनिक, वय 31 वर्ष, रा. आराधना नगर, नागपूर 2) सोनु उर्फ बाबा उर्फ रामु हिरामण वनवे, वय 26 वर्ष, रा. किर्ती नगर, नागपूर व 3) नितीन माणीकराव देशमुख, वय 33 वर्ष, रा. बेलदार नगर, नागपूर यांना दिनांक 02/07/2018 ला अटक करण्यात आली होती. तसेच आज दिनांक 03/07/2018 चे 02.28 वा. सदर गुन्हयातील उर्वरीत आरोपी क्र. 4) वैभव अशोकराव तांन्नेलाल, वय 26 वर्ष, रा. हसनबाग, नंदनबन नागपूर 2) गोपाल उर्फ गोपी पुरूषोत्तम तराडे, वय 26 वर्ष, रा. खरबी रोड, नागपूर यांनाही अटक करण्यात आली आहे. वर नमुद पाचही आरोपीतांना दिनांक 07/07/2018 पर्यंत कोर्टातुन पि.सी.आर देण्यात आले आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात कन्हानचे उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. ईश्वर कातकडे, पोलीस स्टेशन कन्हानचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकान्त काळे, पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे, पोउपनि श्री. अनिल राऊत, सहा. पोउपनि. लक्ष्मीप्रसाद दुबे, पो.हवा. सुरज परमार, निलेश बर्वे, नाना राऊत व पोलीस नाईक सत्यशिल

कोठारे, शैलेष यादव, पो.कॉ. प्रणयसिंग बनाफर व चालक सपोउपनि साहेबराव बहाळे व सायबर सेल ना. ग्रा यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



अटक आरोपीतांसह स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी

# नागपूर ग्रामीण पोलीसांचे ऑनलाईन फसवणुक पासुन सावध राहण्याचे आवाहन

इंटरनेट युगामध्ये ऑनलाईन व्यवहारात वाढ झाली असलेने ऑनलाईन फसवणुकीच्या प्रमाणात सुद्धा वाढ झालेली आहे. चोरटे सुद्धा विविध युक्त्या काढुन नागरीकांना फसवित आहे. मुळातच मोबाईल वरील बैकेशी संबंधीत व्यवहाराचे संचालनाला बळी पडु नका. ऑनलाईन व्यवहार करतांना काळजी घ्या पैशाचे आमिषाला बळी पडु नका. वेबसाईड वर माहिती पाठवितांना चेक करून खात्री झाल्याशिवाय माहिती पाठवु नका. आपला ओटीपी नंबर कुणालाही शेअर करू नका इत्यादी सावधतेच्या सुचना सायबरसेल ने वेळोवेळी नागरीकांना देवुन फ्लॅक्स बोर्ड लावुन, पत्रके वाटुन चर्चा सत्रे घेवुन जनजागृति करण्यात आली आहे. अश्या गुन्हयांना आळा बसवायचा असेल तर नागरीकांना जागृत करणे फार गरजेचे आहे. बॅक फ्रॉड करणारे चोरटे मुख्यतः मी बैकेतुन बोलतो आहे. तुमच्या खात्याच्या ए.टी.एम मध्ये अडचण आली आहे. त्याची वैद्यता  संपत आली  आहे. त्यासाठी तुम्हाला ओ.टी.पी. नंबर तुमच्या मोबाईलवर पाठविला आहे तो क्रमांक सांगा असे संवाद साधुन भुरळ घालतात. या पासुन नागरीकांनी सावध असावे. बैकेतील आपली सुरक्षित रक्कम आपण थोडया चुकी मुळे अनोळखी इसमांच्या हातात देतो. फसवणुकिची रक्कम त्वरीत मिळणे करीता करीता जनतेने व संबंधित बैकेने सहकार्य मिळणे गरजेचे आहे. पोलीसांना सहकार्य केल्यास ग्राहकांना अशतः का होईना त्यांची रक्कम परत करण्यास मदतच होते. त्वरीत माहिती ळिाल्या मुळे नागपुर ग्रामीण सायबर सेल मुळे काही ग्राहकांची फसवणुक झालेली रक्कम त्यांना परत मिळुन देण्यात आलेली आहे. ए.टी.एम. फ्रॉड करणा–या टोळया मुख्यतः शनिवार रविवार किंवा सलग सुटया येणारे दिवस फसवणुकीसाठी निवडतात असे दिसते कारण आपण फसलो आहे हे ग्राहकांच्या लक्षात आले तरी सुटयांच्या दिवशी बैक बंद असल्याने आवश्यक कागदपत्रे ग्राहक पुरवु शकत नाही व चोरटयांचे फावते. या साठी नागरीकांनी जागरूक असणे गरजेचे आहे. असे आव्हान ग्रामीण पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांनी जनतेला केले आहे. प्रत्येक पोलीस स्टेशन ला ग्राहकांच्या फसवणुकी नंतर सायबर सेल ला कोणती आवशक माहिती पाठवावी. याचा नमुना फॉर्म पाठविण्यात आलेला आहे. तो फॉर्म त्वरीत भरून सायबर सेल कडे पाठवावा. जेने करून ग्राहकांनी फसवणुक झालेली रक्कम लगेच थांबवुन त्यांना परत करण्याची प्रक्रिया करता येईल. ए. टी.एम फ्रॉड प्रमाणेच आणखी एक नविन शक्क्ल चोरटयानी वापरणे सुरू केले आहे. ज्यात आपणास 5 लाखाचे बक्षिस लागलेले आहे खालील वेबसाईड लिंक वर क्लिक करा असा संदेश येतो परंतु ती बेवसाईड बनावट असते. त्या बनावट वेबसाइड मधे http ऐवढाच मजकुर असतो. असा मजकुर असल्यास ती वेबसाईड बवानट असते. कारण मुळ वेबसाईड मधे https असे लिहलेले असते म्हणुन “S” बघुन सुरक्षित राहा” असे आव्हान पोलीस अधिक्षक यांनी केलेले आहे. सोशल मिडियावर महिलांचे/तरूणींचे बनावट फेसबुक अकांउट तयार केल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत.

अश्या घटनां नातेसंबंधा मुळे व ओळख असलेल्या व्यक्ति कडुनच सोशल मिडियाचा गैरवापर करून त्रास झाल्याचे बहुतांशी प्रकरणे समोर आलेली आहेत. त्या मुळे सोशल मिडियावर स्वतःचे फोटो, कुटुबांचे फोटो व इतर वैयक्तीक माहिती अपलोड करतांना काळजी घ्यावी. व असे प्रकार निर्दशनास आल्यास त्वरीत जवळच्या पोलीस स्टेशच्या मार्फतीने सायबर सेलशी संपर्क साधावा. आगामी काळात येणारे सण/उत्सव लक्षात घेता काही समाजकंटक क्षुल्लक कारणावरून सामाजिक अशांतता निर्माण करण्या करीता सोशल मिडियाचा गैरवापर करून आक्षेपार्ह मेसेज व्हायरल करतात अश्या अफवांना नागरीकांनी बळी पडु नये कायदा व सुव्यवस्था हातात घेवु नये अश्या घटनांन बाबत पोलीसांना त्वरीत माहिती दयावी असेही आवाहन पोलीस अधिक्षक यांनी केले आहे.

# नरखेड पेट्रोलपंपावर दरोडा टाकणारे आरोपी जेरबंद

फिर्यादी नामे– प्रकाश गोविंदा नारनवरे, वय 23 वर्ष, रा. वार्ड क्र.–13, इंदिरानगर, नरखेड यांनी दि. 14/07/2018 रोंजी पोस्टे. नरखेडला येवुन तोंडी तक्रार नोंदविले होती. फिर्यादी व त्यांचे दोन सहकारी हे इंशा पेट्रोलपंप सावरगाव रोड नरखेड येथे दि. 13/07/2018 चे 22.30 वा. हजर असतांना सहा अनोळखी ईसमांनी दोन मोटारसायकलवर येत फिर्यादी व त्यांचे दोन साथिदारांना चाकुचे व कट्टयासारख्या शस्त्राची भिती दाखवित त्यांच्याजवळील नगदी 13,260/–रू व मोबाईल फोन किमती 8999/– असा एकुण 22,259/– रू. चा माल जबरीने हिसकावुन नेला होता. तसेच आरोपीतांनी सी.सी.टी.व्ही. व डी.व्ही.आर. बॉक्सची तोडफोड करीत 10,000/–रू चे नुकसान केले. फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे नरखेड येथे अप.क्र. 226/18 कलम 395, 427 भादवि प्रमाणे गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

सदर गुन्हयातील आरोपींच्या शोधार्थ विशेष पथकाची नेमणूक करीत घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही फुटेजद्वारे तपास सुरू करण्यात आला. दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील फाटो हा आरोपी निलेश कोकाटे रा. परसोडी दिक्षीत याचा असल्याचे निष्पन्न झाले. तसेच घटनेवेळी दोन मोटारसायकलवरील सहा आरोपीतांचे वर्णन हे नरखेड परिसरात घटना होणेपुर्वी दिसून आले. त्यानुसार खात्रीने मिळालेल्या माहितीनुसार आरोपी क्र 1) चंद्रकांत ऊर्फ शेखर मंगल लैसिह, वय 27 वर्ष, रा. परसोडी दिक्षित ता. नरखेड यास पोस्टे पथक क्र. 01 ने मोठया शिताफीने ताब्यात घेतले व बारकाईने विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्यानंतर उर्वरित पाच आरोपींबाबत त्याने माहितमी दिली. यानंतर आरोपी क्र. 1) ला दि. 15/07/2018 चे 20.41 वा. अटक करण्यात आली. तसेच आरोपी क्र. 2) चंद्रशेखर ऊर्फ निलेश प्रभाकर कोकाटे, वय 27 वर्ष, रा. परसोडी दिक्षित ता. नरखेड ह.मु. लाही हॉलचे जवळ, पिंपळकर यांचे घरी किरायाने दाते ले–आऊट, जयताळा नागपुर यास दि. 16/07/2018 रोजी 08.01 वा. अटक करण्यात आली. आरोपी क्र. 1 व 2 यांचा दि. 16/07/2018 ते दि. 21/07/2018 पर्यंत पी.सी.आर. घण्यात आला. दरम्यान आरोपी क्र. 2 यास सोबत घेवुन तसेच सायबर सेलची वारंवार मदत घेत व मा. उपविभागिय पोलीस अधिकारी साहेब यांचे सततचे मार्गदर्शनावरून नागपुर शहर येथे आरोपींचा इनोव्हा गाडीने पळुन जात असता सिनेस्टाईल पध्दतीने पाठलाग करून आरोपी क्र. 3) अक्षय रमेश वरूडकर, वय 23 वर्ष, रा. वार्ड क्र. 3 शनिवारपेठ कोंढाळी 4) भुषण चिरकुटराव पैठे, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र. 07 कोंढाळी 5) जगदीश मारोतराव हजारे, वय 25 वर्ष, रा. रा. अध्यापक ले आउट नागपुर 6) स्वप्नील वामनराव ढोरे, वय 25 वर्ष, रा. जयताळा नागपुर यांना ताब्यात घेवुन दि. 17/07/2018 रोजी चे 05.09 वा. अटक करण्यात आली. त्यांचा दि. 21/07/2018 पावेतो मा. विद्यमान कोर्टातुन पी.सी.आर. घेण्यात आला असुन आरोपी क्र. 3 ते 6 हे गुन्हा करून इनोव्हा गाडी क्र. एम.एच.31 सी.एन. 1808 ने पळुन जात असल्याने आरोपी क्र. 5 याचेकडुन पळुन जात असलेल्या इनोव्हा गाडी किमती 5,00,000/–रू. जप्त केली आहे. तसेच आरोपीतांचे एकुण सहा मोबाईल किमती 23,000/–रू ही जप्त करण्यात आले. तसेच एका आरोपीकडून 2,420/–रू., एक चाकु व एक देशी कट्टा जप्त करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोनि श्री. दिलीप मसराम हे करत असुन त्यांचे अधिक परिश्रमाने पोलीस अधिक्षक साहेब व अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात तसेच उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांचे विशेष प्रयत्नाने पोस्टे चे दोन पथक पोहवा धनराज भुक्ते, हरीहर सोनोने, पोलीस नाईक लखन महाजन, पोशि राजीक शेख, पुरूषोत्तम काकडे, पृथ्विराज चव्हान, नितेश पुसाम, अनिस शेख, मनिष सोनोने,कैलास टेकाडे, मिलींद राठोड, दिगांबर राठोड, संतोष क्षिरसागर व सायबर सेलचे कर्मचारी चेतन राउत व तुलाराम चटप यांनी मोलाची कामगिरी बजावुन व कठोर परिश्रम घेवुन गंभीर गुन्हा उघडकीस आणला. विशेष बाब अशी की लखन महाजन व पृथ्विराज चव्हान यांनी गुन्हा दाखल होताच गोपनिय यंत्रणा कार्यान्वित करून मोलाची कामगिरी बजावली व उपविभागिय पोलीस अधिकारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व भेटी तसेच आरोपी शोधबाबत सुचना दिल्याने वेळीच आरोपी अटक झालेले आहेत. तपास सुरू आहे.




उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. विक्रम कदम सह पो.स्टे. नरखेडचे अधिकारी व कर्मचारी जबरी चोरी करणारे अटक आरोपी व मुद्येमालसह

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. देवलापार :– दिनांक 26/07/18 रात्री 01.00 वा. दरम्यान पोलीस हवालदार अशोक उईके, पोलीस नाईक मिथीलेश पांडे पो.स्टे. देवलापार हे पो. स्टे परीसरात रात्रगस्त चेकींग डयुटी करित असतांना बेलदा ते हिवराबाजार रोडने महेन्द्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच–36/एए–0679 मध्ये अवैद्यरित्या गोवंश भरून कत्तलीकरिता चोरटी बाहतुक होत असल्याची खबर मिळाल्याने त्यांनी त्वरीत सहायक पोलिस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी ठाणेदार पो.स्टे. देवलापार यांना फोन व्दारे माहिती दिली. दरम्यान काही वेळातच सहायक पोलिस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी ठाणेदार पो.स्टे. देवलापार हे हिवराबाजार येथील मोबाईल चौकात हजर झाले. त्यांनी स्टाफसह नाकाबंदी करून वाहन तपासनी करीत असतांना बेलदा कडुन हिवराबाजार कडे एक महीद्रा बोलेरो पिकअप गाडी भरधाव वेगाने येतांना दिसल्याने सदर वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये मागील डाल्यात गाय, गोऱ्हे व कालवड अत्यंत क्रुर व निर्दयतेने त्यांचे तोंड, शिंगे, मान व पाय आखुड दोराने बांधुन एकावर एक रचुन भरलेल्या स्थितीत दिसुन आले. यावरुन आरोपी वाहन चालकास व त्याचे साथिदारांना नाव पत्ता विचारला असता चालकाने स्वतःचे नाव 1) नितेश सखाराम घेबये, वय 32 वर्ष, रा. मंगरली, ता. तुमसर, जि. भंडारा व त्याचे साथिदारांनी त्यांचे नाव 2) निरंजन डोमा घराडे (गाडी मालक), वय 40 वर्ष, रा. लवादा, ता. तुमसर, जि. भंडारा यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच इतर एक आरोपी नामे– रामेश्वर, रा. पिंडकापार हा अंधाराचा फायदा घेत व पोलीसांची नजर चुकवुन पळुन गेला. दरम्यान पळुन जाणारा आरोपी नामे– रामेश्वर पुरूषात्तम दशमेर, वय 32 वर्ष, रा. पिंडकापार, ता. रामटेक याचा शोध घेऊन मौजा पिंडकापार येथून ताब्यात घेण्यात आले. तिन्ही आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली. सदर गुन्हयात एकुण 7 गोवंश किं. 47,000/– रू., एक महेंद्रा पिकअप गाडी क्रमांक एम.एच–36/एए.–0679 किमंती 7,00,000/– .असा एकुण 7,47,000/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेले गोवंश व्यवस्थापनार्थ व देखभाली करिता गोरक्षण केंद्र देवलापार येथे दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे स.पो.नि. सुरेश सी. मट्टामी, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीतांविरुध्द 11(1),(घ),(ड),(च) प्राण्यांना निर्दयतेने वागविणे अधिनियम सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम 34 भा.दं.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. सुरेश सी. मट्टामी हे करीत आहे.




पो.स्टे. देवलापारचे कर्मचारी अटक आरोपी व मुद्येमालसह

## सात महीन्यापुर्वी पर्यटकाला लुटणारा गुन्हेगार जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 01/12/2017 रोजी 14.45 ते 15.00वा. फिर्यादी मनिष दशरथ मसराम रा. नागपूर हा आपले मित्रासोबत पर्यटन स्थळ वाकी येथे फिरायला गेला असता तो मोबाईल फोनबर बोलत असतांना दोन अज्ञात आरोपीतांनी त्याचे जवळ येऊन त्याचे हातातील लेनोवो कं. चा मोबाईल किमती 6,000/–रु. चा जबरीने हिसकावुन नेले. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन खापा येथे अप. क्र. 283/17 कलम – 392, 34 भा.द. वि अन्वये नोंद करण्यात आलेल्या गुन्हयाचा समांतर तपास स्थानीक गुन्हे शाखेचे पो.नि. श्री. संजय पुरंदरे यांचे मार्गदर्शनात त्यांचे विशेष पथक करीत असतांना आरोपीचा शोध घेऊन आरोपी क. 1) ईर्शाद नसीमउद्दीन सिद्दीकी, वय 20 वर्ष, रा हवामहल, सिल्लेवाडा यास दि. 24/07/18 चे 00.30 वा. सिल्लेवाडा येथुन ताब्यात घेऊन सखोल विचारपुस केली. दरम्यान आरोपीने सिल्लेवाडा येथे राहणारा त्याचा मित्र आरोपी क. 2) चंदु ऊर्फ चांद हसन अंसारी, वय 24 वर्ष, रा. सिल्लेवाडायाचे सोबत सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. नमुद दोन्ही आरोपीस त्यांचे कडुन जप्त केलेला चोरीच्या मोबाईल सह पुढील कार्यवाहीकरीता पो. स्टे. खापा चे स्वाधीन केले.

\` सदरची कामगीरी मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात स्थनिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे, सपोनि. श्री. अरविंद सराफ, सहा. पोउपनि. लक्ष्मीप्रसाद दुबे, पो.हवा. सुरज परमार, चंद्रशेखर घडेकर, निलेश बर्वे, व ना.पो.कॉ. सत्यशिल कोठारे, चेतन राऊत, पो.कॉ. प्रणयसिंग बनाफर, सतिश राठोड चालक नापोशि अमोल कुथे यांनी केली.



स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे अधिकारी व कर्मचारी
जबरी चोरी करणाऱ्या अटक आरोपीसोबत

## अपघातात मृत्यू झालेले कर्मचारी ठाकूर कुटुंबियांना 30 लाखांची मदत
## नागपूर ग्रामीण पोलीस दल व एचडीएफसी बँकचा पुढाकार

नागपूर ग्रामीण पोलीस दलातील नापोशी. हरेंद्र सिंग ठाकूर नेमणूक महामार्ग यांचे अपघाती निधन झाले होते. या अपघातामध्ये ठाकूर यांच्या परिवाराला सहाय्य करण्याच्या दृष्टीकोणातून नागपूर ग्रामीण पोलीस दल व एचडीएफसी बँकेने सकारात्मक पाऊले उचलली. त्यानुसार एक महिन्याच्या आता हरेंद्र सिंह ठाकूर यांच्या पत्नी प्रियंका ठाकूर, यांना 30 लाख रुपयांची सहायता निधी त्यांना देण्यात आले. दिनांक 19/07/2018 रोजी गुरुवारी मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. शैलेश बलकवडे साहेब यांच्या हस्ते प्रियंका ठाकूर यांना 30 लाखांचा चेक देण्यात आला. यावेळी एचडीएफसी बँकेचे कल्सटर हेड श्री. गगनदीप बुद्धराजा व अन्य अधिकारी शरद मिश्रा, समीर गुप्ता, विक्रम चौव्हाण, पोलीस उपअधीक्षक श्री. गृह कैलास गावडे यांची उपस्थिती होती. भविष्यात अश्याच प्रकारे घटना घडल्यास पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सहयाय करण्यात येणार असे आश्वासन मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे साहेब यांनी दिले.




कर्मचारी ठाकूर कुटुंबियांना 30 लाखांचा धनादेश देतांना
पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. शैलेश बलकवडे साहेब व इतर अधिकारी.